Advanced International Journal for Research (AIJFR)
E-ISSN: 3048-7641 ● Website: www.aijfr.com ● Email: editor@aijfr.com

# राजकीय सिध्दातांची व्याप्ती

**प्रा.डॉ.धुमाळे धोंडीराम कामाजी**

शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ

राज्याची निर्मिती मानवाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी झाली आहे. सर्वश्रेष्ठ जीवनासाठी राज्य टिकुन आहे असे ॲरिस्टॉटल यांनी म्हटले होते. हॉब्ज रूसो, मॅकेव्हीली यांनी आपल्या सामाजिक करार सिध्दातांत मानवी स्वभाव या घटकाला अधिक महत्व दिले आहे. यातून व्यक्तीवादी विचार पुढे आला आहे. या सामाजिक करारात व्यक्तीचे अधिकार व संरक्षण याला धरून सामाजिक कराराची रचना करण्यात आली आहे. व्यक्ती वर्तनाच्या अभ्यासाला आजच्या आधुनिक काळात महत्व प्राप्त झाले आहे. एकंदरीत असे म्हणता येईल की, राजकीय सिध्दातांचा मुख्य उद्देश व्यक्ती आणि समाजाचा सर्वांगीण विकास करणे हा आहे.

मनुष्य हा राज्यात राहिल्याशिवाय त्याचा सर्वांगीण विकास होणार नाही हे सत्य आहे. ॲरिस्टॉटल म्हणतो की, जो राज्यात राहात नाही तो देव असेल किंवा पशू असेल आणि पुढे तो म्हणतो मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. प्लेटोने आपल्या उपआदर्श राज्यात राज्याचे महत्वाचे घटक सांगितले आहेत. ॲरिस्टॉटलने आपल्या आदर्श राज्यात राज्याचे महत्वाचे पैलू स्पष्ट केले आहे. राज्य उदयाचे अनेक सिध्दांत राजकीय सिध्दातांत मांडले आहेत. राज्याचा उदय, विकास, अर्थ, व्याख्या, हेतू, स्वरूप, कार्य यासंबंधीचे वर्णन सिध्दांतात आढळते.

आज जगात विविध देशात दहशतवादाचे फार मोठे हल्ले होत आहेत. त्यात भारत, पाक, अमेरिका आहेत. याचा परिणाम जगात पसरत आहेत त्यामुळे जागतिक दहशतवादाच्या अभ्यासाला महत्व पटले. त्यामुळे पुढे जागतिक शांततेला महत्व प्राप्त झाले त्याला अनुसरून सिध्दातांत जागतिक शांततेचे सिध्दांत मांडले गेले.

राजकीय सिध्दांतामध्ये प्लेटीच्या रिपब्लीकन, ॲरिस्टॉटलच्या पॉलिटीकस, मार्क्सचा दास कॅपीटल जे.एस.मिल ऑन लिबर्टी या ग्रंथाचा अभ्यास केले जातो. विशिष्ट काळात व परिस्थितीनुसार ते सिध्दांत किंवा ग्रंथ लिहिले जातात त्यांच्यामध्ये राजकीय व ऐतिहासिक संदर्भ दिलेले असतात. काळ,परिस्थिती काळानुसार राजकीय सिध्दातांचे संदर्भ बदलत जातात. साहित्याचा हा मुलभूत विचार नव्या राजकीय सिध्दांताला उपयुक्त ठरतो यात कांही शंका नाही.

जगातील अनेक देशाच्या राजकीय विचारप्रणालीचा अभ्यास राजकीय सिध्दांतामध्ये केला जातो. उदा. भारताच्या लोकशाही समाजवाद, अभ्यास, अमेरिकेतील उदारमतराही लोकशाहीचा अभ्यास, चीनच्या साम्यवादी विचार प्रणालीचा अभ्यास जगात विविध देशात विविध विचारप्रणाल्या अस्तित्वात आहेत. त्या सर्व विचार प्रणाली अभ्यास राजकीय सिध्दांतामध्ये सविस्तरपणे केला जातो.

आधुनिक काळात पर्यावरणाचा अभ्यास राजकीय सिध्दांत केला जात आहे. आज हवा, पाणी, सुर्यप्रकाश यांचे मोठया प्रमाणात प्रदूषण वाढले आहे. याचा परिणाम वाईट मानवी जीवनावर होत आहे. यावर वेळीच नियंत्रण आले तर मानवी जीवन चांगले राहणार आहे. नाहीतर मानवी जीवन धोक्याचे राहणार आहे. त्यामुळे राजकीय सिध्दांतामध्ये हरित सिध्दांताची मांडणी करण्यात येत आहे. पृथ्वी संमेलन 1997 मध्ये घेण्यात आले यामध्ये याविषयावर सविस्तर चर्चा झाली आहे.

आज जगात अनेक प्रकारच्या शासन संस्था अस्तित्वात आहेत. आपल्या देशात लोकशाहीची शासन व्यवस्था आहे. ही व्यवस्था यशस्वी करण्यासाठी कोणती अर्थव्यवस्था असावी ? व समाजाची मानसीकता कशी असावी ? याचे उत्तरे राजकीय

सिध्दांतातून मिळत असतात. एकंदरीत जगातील विविध शासन संस्थांचा मागोवा व महत्व, समस्या या घटकाचा अभ्यास राजकीय सिध्दांतात केला जातो.

राजकारणात अनेक वेगवेगळया संकल्पना आहेत त्याचे अर्थ काळ, परिस्थितीनुसार लावले जातात हे निश्चित आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय, सार्वभौमत्व अधिकार, समता, या संकल्पना स्पष्ट करण्याचे महत्त्वाचे कार्ये विविध अभ्यासक करत असतात. या संकलनेचे स्पष्टीकरण करण्याचे महत्वाचे कार्ये राजकीय सिध्दांत ठरतो.

दोन देशातील किंवा त्यापेक्षा अधिक देशातील संबंध कसे असावेत या संबंधीचा अभ्यास राजकीय सिध्दांतात केला जातो. राज्याराज्यातील संबंध संघर्षमय असण्यापेक्षा मैत्री, सहकार्य पूर्ण असावेत अशी अपेक्षा राजकीय सिध्दांत ठेवतो.

शासनाच्या विविध अंगाचा सविस्तरपणे व सखोल अभ्यास राजकीय सिध्दांतात केला जातो. शासनाच्या विविध अंगाची वैशिष्ट्ये, गुण-दोष याचाही सखोल अभ्यास राजकीय सिध्दांतात केला जातो.

राज्य आणि व्यक्ती यांच्या संबंधात सहकार्य,मदत होत असेल तर त्या राज्याचा विकास होतो. जर व्यक्ती आणि राज्य यांच्यात संघर्ष, तटस्थता असेल त्या राज्याचा कांहीच उपयोग होऊ शकत नाही. या सर्व घटकाचा अभ्यास राजकीय सिध्दांतात केला जातो.

**राजकीय सिध्दांताचे महत्व**

सिध्दांताशिवाय संशोधन करता येत नाही त्यामुळे राजकीय सिध्दांताला महत्व प्राप्त झाले आहे. नवे निष्कर्ष काढण्यासाठी सुध्दा राजकीय सिध्दांत उपयुक्त ठरतो. सिध्दांताशिवाय संशोधकाला दिशा मिळत नाही.

आजच्या काळात परिवर्तनामुळे जे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यात आर्थिक प्रश्न, राजकीय प्रश्न यांचा समावेश आहे. ते प्रश्न सोडविण्याचे काम राजकीय सिध्दांत करत आहे.

व्यक्ती आणि राजकीय संस्था यांचे संबंध कसे असावे कसे असल्यामुळे व्यक्ती व राज्याचा विकास होणार आहे हे सांगण्याचे महत्वाचे काम राजकीय सिध्दांत करत आहे.

समाजाला दिशा व मार्गदर्शन करण्याचे महत्वाचे कार्य राजकीय सिध्दांत करतो. समाजाला नैतिक व आदर्श बाबी सांगुन समाज कसा आदर्श बनेल यासाठी राजकीय सिध्दांत प्रयत्न करत आहे. त्यामुळे राजकीय सिध्दांताला महत्व प्राप्त झाले आहे.

कोणत्या देशात कोणती राजकीय व्यवस्था योग्य आहे हे सांगण्याचे महत्वाचे कार्य राजकीय सिध्दांत ठरतो. त्यामुळे राजकीय सिध्दांताचे आजच्या काळात महत्व वाढले आहे.

शासन व्यवस्थेत काम करण्याची गरज आहे त्यात कोणते बदल केल्यामुळे ती व्यवस्था आदर्श व्यवस्था होणार आहे. बदल न केल्यास काय तोटे होणार आहे यांचे मार्गदर्शन राजकीय सिध्दांत करतो.

राजकीय परिभाषांना निश्चित कार्ये देण्यासाठी स्वातंत्र्य, समता, न्याय याचा समाजात सरळ अर्थ काढला जातो. समाजात अनेक विचाराची माणसे असतात ते आपल्या सोईनुसार अर्थ काढत असतात. परंतू राजकीय सिध्दांत अशा संकलनेचा निश्चित अर्थ स्पष्ट करतो. त्यामुळे राजकीय सिध्दांताला महत्व प्राप्त झाले आहे.

राजकीय सत्तेचा उद्देश लोकांचे कल्याण असतो जे.एल.मिलच्या स्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समानता यामुळे शासनाला योग्य दिशा मिळाली आहे. त्याचा उपयोग जगातील अनेक देशाला झाला आहे.

लोकांचे प्रबोधन करण्यासाठी राजकीय सिध्दांत प्रयत्न करतो. प्लेटो, ॲरिस्टॉटल, मार्क्स या सारख्या विचारवंताच्या वाङ्मयातून जीवन कसे जगावे कळते. लोकांना अधिकार व कर्तव्यांची जाणीव निर्माण होते. यामुळे सध्याच्या काळात राजकीय सिध्दांताचे महत्व वाढले आहे.

जगात ज्या कांही क्रांत्या झाल्या त्याला प्रेरणा देण्याचे महत्वाचे कार्ये राजकीय सिध्दाताने केले आहे. फ्रेंच राज्यक्रांती, अमेरिकन राज्यक्रांती याला जे.एस.मिलच्या सामुहिक ईहा पासुन प्रेरणा मिळाली आहे.

देशातील समाजात परस्पर सामंजस्य, सहकार्य, सहिष्णूता वृत्ती, दुसऱ्या बद्दल चांगले विचार असल्याशिवाय समाज एकात्मतेने राहु शकत नाही. समाजात संघर्ष व हिंसेचे वातावरण असेल तर मानवी विकासात अडथळे निर्माण होतील त्यामुळे सिध्दातांचे मार्गदर्शन असणे आवश्यक असते.

**संदर्भ ग्रंथ**

1) राजकीय सिध्दांत - प्रा.सुधाकर कुलकर्णी
2) राजकीय सिध्दांत - डॉ.अनिरूध्द देशपांडे
3) राजकीय शास्त्र व सिध्दांत - डॉ.बी.एल.फडके
4) आधुनिक राजकीय विचार - डॉ.आर.एम.पळशीकर
5) राजकीय शास्त्रांची मुलतत्वे - डॉ.अशोक देशमुख
6) राजकीय विचारधारा - डॉ.प्रभाकर देशमुख
7) राजकीय विचार आणि सिध्दांत - डॉ.एस.एन.पाटील